RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक १०७] सोमवार, ऑगस्ट २०, २०१८/श्रावण २९, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३०४

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्र. इएनटी-२०१६/प्र.क्र.१०१ /टी-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. इएनटी-२०१६/ प्र.क्र.१०१/ टी-१, दि. ३० जून २०१६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये बहुविध यंत्रणा परिचालक (Multy System Operator) तसेच स्थानिक केबल परिचालक (Local Cable Operator) यांना महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (१९२३ चा महा. १) (यापुढे ज्याचा उल्लेख " करमणूक शुल्क अधिनियम " असा करण्यात आला आहे) मधील तरतुदींनुसार देय करमणूक शुल्काची रक्कम शासनाकडे चुकती अदा करण्यासंदर्भात तसेच नियत कालमर्यादेमध्ये उक्त लोकसेवा पुरविण्याबाबत, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी या बाबी उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अधिसूचित केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाऐवजी पंचायत किंवा नगरपरिषदा किंवा प्रादेशिक परिषद किंवा जिल्हा परिषद यांना करमणुकींवर कर बसवून तो गोळा करण्यास सक्षम करण्याच्या हेतूने संविधान (एकशे एकवी सुधारणा) अधिनियम, २०१६ अन्वये भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील दुसऱ्या यादीमधील (राज्य यादी) नोंद क्र. ६२ मध्ये बदल करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त संविधान सुधारणा अधिनियमाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमान्वये निर्गमित करण्यात आलेल्या उक्त अधिसूचनेची उपयोगिता राहिलेली नसल्यामुळे उक्त अधिसूचना रद्द करणे आवश्यक आहे.

आता, त्यामुळे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार व महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम (सन १९०४ चा अधि. क्र. १) च्या कलम २१ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन उक्त अधिसूचना याद्वारे रद्द करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. माधव वीर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th August 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA GENERAL CLAUSES ACT AND MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. ENT.2016/C.R.101/T-1.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Revenue and Forests Department No. ENT.2016/C.R.101/T-1, dated the 30th June 2016 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015) (hereinafter referred to as "Public Services Act"), notified the public service of allowing the Multi System Operator (M.S.O.) and Local Cable Operator (L.C.O.) to pay entertainment duty due and payable under the Maharashtra Entertainments Duty Act (1 of 1923) (hereinafter referred to as "Entertainments Duty Act") along with the stipulated time limit for providing the said public service, the Designated Officer, First Appellate Authority and Second Appellate Authority, as specified therein for the purposes of the Public Services Act ;

And Whereas, by the Constitution (One Hundred and First Amendment) Act, 2016 entry 62 in List II (State List) of the Seventh Schedule to the Constitution of India has been substituted and the power to levy and collect taxes on entertainments is now conferred on the Panchayat or Municipality or a Regional Council or a District Council instead of the State Government ;

And Whereas, in view of the said Constitutional Amendment Act it is considered expedient to rescind the said notification issued under the Public Services Act being infructuous.

Now, therefore, the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904) hereby rescinds the said notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MADHAV VEER,
Deputy Secretary to Government.

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्र. इएनटी-२०१६/प्र.क्र.१०१/टी-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. इएनटी-२०१६/प्र.क्र.१०१/टी-१, दि.२ सप्टेंबर, २०१६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये करमणुकीच्या विविध साधनांच्या संबंधित अर्जदारांना महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (१९२३ चा महा. १) (यापुढे ज्याचा उल्लेख " करमणूक शुल्क अधिनियम " असा करण्यात आला आहे) मधील तरतुदींनुसार देय करमणूक शुल्काची रक्कम शासनाकडे चुकती करण्यासंदर्भात तसेच नियत कालमर्यादेमध्ये उक्त लोकसेवा पुरविण्याबाबत, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी या बाबी उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अधिसूचित केल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाऐवजी पंचायत किंवा नगरपरिषदा किंवा प्रादेशिक परिषद किंवा जिल्हा परिषद यांना करमणुकीवर कर बसवून तो गोळा करण्यास सक्षम करण्याच्या हेतूने संविधान (एकशे एकवी सुधारणा) अधिनियम, २०१६ अन्वये भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील दुसऱ्या यादीमधील (राज्य यादी) नोंद क्र. ६२ मध्ये बदल करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त संविधान सुधारणा अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमान्वये निर्गमित करण्यात आलेली उक्त अधिसूचनेची उपयोगिता राहिलेली नसल्यामुळे उक्त अधिसूचनेत अधिसूचित करण्यात आलेल्या लोकसेवा ह्या रद्द करणे आवश्यक आहे.

आता, त्यामुळे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार व सर्वसाधारण महाराष्ट्र वाक्खंड अधिनियम (सन १९०४ चा अधि. क्र. १) च्या कलम २१ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन उक्त अधिसूचना याद्वारे रद्द करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. माधव वीर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th August 2018.

### NOTIFICATION

MAHARASHTRA GENERAL CLAUSES ACT AND MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. ENT.2016/C.R.101/T-1.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Revenue and Forests Department No. ENT.2016/C.R.101/T-1, dated the 2nd September 2016 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015) (hereinafter referred to as "Public Services Act"), notified the public service of allowing the proprietor of various types of entertainments specified therein to pay entertainment duty due and payable under the Maharashtra Entertainments Duty Act (1 of 1923) (hereinafter referred to as "Entertainments Duty Act") along with the stipulated time limit for providing the said public service, the Designated Officer, First Appellate Authority and Second Appellate Authority, as specified therein for the purposes of the Public Services Act ;

And Whereas, by the Constitution (One Hundred and First Amendment) Act, 2016 entry 62 in List II (State List) of the Seventh Schedule to the Constitution of India has been substituted and the power to levy and collect taxes on entertainments is now conferred on the Panchayat or Municipality or a Regional Council or a District Council instead of the State Government ;

And Whereas, in view of the said Constitutional Amendment Act it is considered expedient to rescind the said notification issued under the Public Services Act being infructuous ;

Now, therefore, the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904) hereby rescinds the said notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MADHAV VEER,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.